गट "क" मुख्य परीक्षा 2021 संयुक्त पेपर - 1 MR. Tushar

2021

06 Aug. 2022

**D** → संच क्रमांक

**Q15**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.** 107436

# प्रश्नपुस्तिका – I

## मराठी व इंग्रजी

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

वेळ : 1 (एक) तास

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने लिहावा.**

परीक्षा–क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे ↑ शेवटचा अंक ↑

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता** नमूद करावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Scanned with CamScanner

1. वारुड परिसरात धर्माबाबा दानशूर म्हणून प्रसिद्ध होते, परंतु त्यांच्या पोटी मात्र मुरलीधर हा अत्यंत मूर्ख असा मुलगा जन्माला आला. या वाक्यातील अधोरेखित केलेल्या शब्दांसाठी पुढे दिलेल्या पर्यायातून योग्य त्या अलंकारिक शब्दाचा अचूक पर्याय निवडा.

(1) गाजरपारखी (2) अकलेचा खंदक (3) गुळाचा गणपती (4) कर्णाचा अवतार

2. 'संयोजन' म्हणजे काय ?

(a) सांधा

(b) कार्यक्रमाची सुसूत्र आखणी

(c) मिलाफ

(d) जोड

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (c) आणि (d) बरोबर (2) फक्त (b) आणि (d) बरोबर

(3) फक्त (a) आणि (d) बरोबर (4) फक्त (b) आणि (c) बरोबर

3. वाक्यातील प्रत्येक शब्दाची व्याकरण विषयक संपूर्ण माहिती सांगणे म्हणजे ________ होय.

(1) प्रयोगविचार (2) पदपरिस्फोट (3) विभक्ती विचार (4) वर्ण विचार

4. 'लाघवी' या शब्दाला समानार्थी नसलेला शब्द ओळखा.

(1) आर्जवी (2) लंपट (3) लडिवाळ (4) प्रेमळ

5. भावकर्तरी प्रयोगाचे वाक्य ओळखा.

(1) आकांक्षा उत्तम गाणे गाते.

(2) आकांक्षाला वडिलांनी IAS बनविले.

(3) आकांक्षाला घरी पोहोचण्यापूर्वीच सांजावले.

(4) आकांक्षाने स्नेहसंमेलनात गाणे म्हटले.

6. एका भाषेतील मजकूर, त्याचा आशय दुसऱ्या भाषेत आणणे म्हणजे ________ होय.

(1) बातमी (2) वृत्तलेखन (3) चौकट (4) भाषांतर



Scanned with CamScanner

7. 'सुपीक' शब्दासाठी विरुद्धार्थी नसलेल्या शब्दाचा अचूक पर्याय लिहा.

(1) नापीक (2) ओसाड (3) वैराण (4) सुबत्ता

8. विरोधी अर्थ व्यक्त करणारी योग्य जोडी कोणती ?

(a) विसंवादी - संवादी (b) वियोगी - योगी

(c) विश्वास - श्वास (d) विनाश - नाश

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) फक्त (a) (3) (a), (b), (c) (4) वरील सर्व

9. 'हसरे फूल' या उदाहरणातील 'हसरे' हे __________ विशेषण आहे.

(1) धातुसाधित (2) नामसाधित (3) विधिविशेषण (4) यापैकी नाही

10. अधिपती, अपमान, निरोगी या शब्दांचा प्रकार कोणता ?

(a) प्रत्ययसाधित शब्द (b) उपसर्गसाधित शब्द (c) शब्दसाधित शब्द (d) अंशाभ्यस्त शब्द

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (d) बरोबर (2) फक्त (a) व (b) बरोबर

(3) फक्त (b) बरोबर (4) फक्त (d) बरोबर

11. जेव्हा वाक्यातील क्रियापद कर्माच्या लिंग वचन पुरुषास अनुसरुन असते, तेव्हा त्या प्रयोगास काय म्हणतात ?

(1) कर्तरी प्रयोग (2) अकर्मक कर्तरी प्रयोग

(3) कर्मणी प्रयोग (4) भावे प्रयोग

12. 'पाणी पाजणे' याचा अर्थ काय ?

(1) पाणी ग्रहण करणे (2) पाणी मुरणे (3) पाणी पडणे (4) पराभव करणे

13. शरयू वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आली, कारण तिने खूप सराव केला.

(1) केवल व मिश्र वाक्य (2) संयुक्त वाक्य

(3) केवल वाक्य (4) मिश्र वाक्य

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Scanned with CamScanner

14. 'हसव', 'बसव', 'चालव' ही उदाहरणे कोणत्या क्रियापद प्रकारातील आहेत ?

(1) सिध्द क्रियापद (2) साधित क्रियापद (3) शक्य क्रियापद (4) प्रयोजक क्रियापद

15. भाववाचक नामांचा अचूक पर्याय निवडा.

(1) फसवेगिरी, लुच्चेगिरी, दांडगाई, लबाडी (2) हिमालय, सह्याद्री, सातपुडा, अरवली

(3) सोने, तांबे, चांदी, लोखंड (4) हरी, वामन, लक्ष्मण, नारायण

16. निळ्या रंगाचे एक रत्न म्हणजे काय ?

(1) निळकंठ (2) चंद्र (3) इंद्रनीळ (4) आकाश

17. अलंकार ओळखा.

भिंत खचली कलथून खांब गेला
जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाळा
तिच्या कौलारी बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकान्त गीत गातो

(1) चेतनगुणोक्ती (2) स्वभावोक्ती (3) अतिशयोक्ती (4) अन्योक्ती

18. 'लोभाजीरावाने जास्त जमीन प्राप्त करण्यासाठी खूप धावाधाव केली; पण अति लोभाने त्याचा मृत्यु झाला' याला म्हणतात ना ________.

(1) आयत्या बिळावर नागोबा (2) अति शहाणा त्याचा बैल रिकामा

(3) अति तिथे माती (4) एक ना धड भारभार चिंध्या

19. 'थंडा फराळ' या म्हणीचा समर्पक वापर असलेली वाक्यरचना कोणती ?

(a) रात्री पाहुण्यांना थंडा फराळ देऊन झोपविले.

(b) सखाराम नेहमीच थंडा फराळ करतात.

(c) राम घरी उशीराने आल्याने आईने त्याला थंडा फराळ देऊन झोपविले.

(d) 'थंडा फराळ' झाला म्हणून काय खायचा नाही ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (c) बरोबर (2) फक्त (b) आणि (d) बरोबर

(3) फक्त (a) आणि (b) बरोबर (4) फक्त (c) आणि (d) बरोबर



Scanned with CamScanner

20. भावकर्तृक क्रियापद नसणारे वाक्य ओळखा.

(1) मी घरी पोचण्यापूर्वीच सांजावले.
(2) पित्त झाल्यामुळे मला आज मळमळते.
(3) उजाडले तेव्हा सकाळचे सहा वाजले होते.
(4) मुलांनी खोटे बोलू नये.

---

21. 'इतपत', 'मुद्दाम', 'झणझण' ही शब्दरूपे अव्ययाची कोणती रूपे दर्शवितात ?

(1) स्थलवाचक क्रियाविशेषण
(2) कालवाचक क्रियाविशेषण
(3) संख्यावाचक क्रियाविशेषण
(4) रीतिवाचक क्रियाविशेषण

---

22. कुठेकुठे, दूरदूर, पुढेपुढे, हळूहळू हे शब्द कोणत्या अभ्यस्त प्रकारातील आहे ?

(1) अंशाभ्यस्त शब्द
(2) पूर्णाभ्यस्त शब्द
(3) अनुकरणवाचक शब्द
(4) उपसर्ग

---

23. राजूला भूक लागली, तो इतरांच्या आधी जेवला. या वाक्याचे केवल वाक्यात रूपांतर कसे होईल ?

(a) राजूला भूक लागली होती, म्हणून तो इतरांच्या आधी जेवला.
(b) भूक लागल्यामुळे राजू इतरांच्या आधी जेवला.
(c) राजूला भूक लागली म्हणून इतरांच्या आधी जेवला.
(d) राजू इतरांच्या आधी जेवला कारण त्याला भूक लागली होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (b) बरोबर
(3) फक्त (b) व (d) बरोबर
(4) फक्त (c) बरोबर

---

24. बहुव्रीही समासाचे उदाहरण ओळखा.

(1) चक्रपाणि, अनंग
(2) रामलक्ष्मण, पापपुण्य
(3) यथाशक्ती, दरदिवस
(4) राजवाडा, रक्तचंदन

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Scanned with CamScanner

25. आज रात्री शेवटचा खेळ होईल. हे वाक्य प्रश्नार्थी (नकारार्थी-भविष्यकाळात) कसे होईल?

(a) आज रात्री शेवटचा खेळ का होणार नाही?

(b) आज रात्री शेवटचा खेळ होईल का?

(c) आज रात्री शेवटचा खेळ होईलच असे नाही?

(d) आज रात्री शेवटचा खेळ नाही का?

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (d) बरोबर (2) फक्त (b) व (c) बरोबर

(3) फक्त (a) बरोबर (4) फक्त (c) बरोबर

---

26. पुढे दिलेल्या पर्यायी उत्तरातून पत्रलेखनाचे वैशिष्ट्य असलेला पर्याय निवडा.

(1) दिलेल्या विचाराला अनुसरुन साधक-बाधक विचार मांडणे.

(2) योग्य व निवडक विचारांची आकर्षक व सुसंगत रीतीने केलेली मांडणी.

(3) उगीच पाल्हाळ न लावता आवश्यक तेवढ्याच गोष्टींचा उल्लेख करणे.

(4) लेखी दिलेल्या निरोपात आपले मनोगत नेमक्या शब्दात मांडणे.

---

27. 'कडून', 'करवी', 'द्वारा', 'मुळे', 'योगे', 'प्रमाणे' ही कोणत्या विभक्तीची अव्यये आहेत?

(1) तृतीया (2) चतुर्थी (3) पंचमी (4) षष्ठी

---

28. ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच क्रियापद असते त्या वाक्यास काय म्हणतात?

(1) केवल वाक्य (2) मिश्र वाक्य (3) संयुक्त वाक्य (4) गौण वाक्य

---

29. 'दुष्मन' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द ओळखा.

(1) रिपू (2) वैरी (3) कलह (4) शत्रू

---

30. 'ओहो', 'अबब', 'ओ', 'बापरे', 'आहाहा', 'अरेच्या' ही कोणती अव्यये आहेत?

(1) संमतिदर्शक (2) आश्चर्यकारक (3) प्रशंसादर्शक (4) शोकदर्शक

---



Scanned with CamScanner

31. पुढीलपैकी केवल वाक्य ओळखा.

(1) मोसमी वारे वाहू लागतात आणि पावसास सुरुवात होते.

(2) जमिनीवरुन एखादी सुसर पाण्यात जावी तशी ती अलगद डोहातल्या पाण्यात उतरली.

(3) आदिवासी जंगलात शिकार करून कंदमुळं शोधून खात असत.

(4) सगळंच जरी बदलत होतं तरी ती मात्र भूतकाळात तशीच जगत होती.

---

32. क्रिया केव्हा घडली, कशी घडली व कुठे घडली ? हे सांगणाऱ्या अविकारी शब्दांना काय म्हणतात ?

(1) उभयान्वयी अव्यय
(2) केवल प्रयोगी अव्यय
(3) क्रियाविशेषण अव्यय
(4) शब्दयोगी अव्यय

---

33. आघातरहित जोडाक्षरांचा योग्य गट ओळखा.

(a) पुण्य, कन्या, वन्य

(b) मान्य, धन्य, कल्ल्याण

(c) पन्हे, कण्हेर, आम्ही

(d) तुम्ही, दोन्ही, कान्हा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर
(2) फक्त (b) व (d) बरोबर
(3) फक्त (a) बरोबर
(4) फक्त (c) व (d) बरोबर

---

34. पुढीलपैकी कोणता शब्द इंग्रजी भाषेतून आलेला नाही ?

(1) पेपर (2) तिकीट (3) पगार (4) मोटर

---

35. 'अंग मेहनतीने पैसे मिळवून उपजीविका करणे' या अर्थाची म्हण ओळखा.

(1) हातावर पोट भरणे
(2) हात गहाण ठेवणे
(3) हातावर आणणे
(4) हातावर मिळविणे

---

36. व्यक्ती किंवा संस्थेची 75 वर्षे पूर्ण झाल्यानंतर जी स्मरणिका प्रकाशित करतात त्याला काय म्हणतात.

(1) रौप्य महोत्सव (2) सुवर्ण महोत्सव (3) हीरक महोत्सव (4) अमृत महोत्सव

---



Scanned with CamScanner

37. 'दिशाभूल' या शब्दाचा योग्य अर्थ ओळखा.

(a) दिशा चुकणे

(b) भुरळ पडणे

(c) भ्रम होणे

(d) विचारांचा गोंधळ होणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (b) व (d) बरोबर
(3) फक्त (a), (c) व (d) बरोबर
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

38. न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्ययांचा गट कोणता ?

(a) की, तर (b) पण, परंतु (c) अथवा, अगर (d) बाकी, तरी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (b) व (d) बरोबर
(3) फक्त (a) व (b) बरोबर
(4) फक्त (c) व (d) बरोबर

39. 'कायमचे लक्षात राहणारे' या शब्दसमुहासाठी एक शब्द वापरून केलेले वाक्य कोणते ?

(a) ही गोष्ट चिरंतन आहे.

(b) तो कायम आठवणीत राहील.

(c) आजचा सामना अविस्मरणीय होता.

(d) अजय तात्पुरता स्मृतीत राहील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (b) व (d) बरोबर
(3) फक्त (c) बरोबर
(4) फक्त (c) व (d) बरोबर

40. ऱ्हस्व-दीर्घाच्या नियमानुसार पुढीलपैकी योग्य शब्द ओळखा.

(a) मी (b) तू (c) मि (d) ति

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (d) बरोबर
(2) वरील सर्व बरोबर
(3) (a) आणि (b) बरोबर
(4) (c) आणि (d) बरोबर



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Scanned with CamScanner

41. जेव्हा क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीय पुरुषी, नपुसकलिंगी व एकवचनी असून स्वतंत्र असते त्याला __________ म्हणतात.

(1) कर्तरी प्रयोग
(2) कर्मणी प्रयोग
(3) भावे प्रयोग
(4) कर्मकर्तरी प्रयोग

42. संयुक्त वाक्याचे उदाहरण ओळखा.

(1) आम्हाला नेण्यासाठी जहाज आले म्हणून आम्ही बचावलो.
(2) आरती सुरु झाल्यावर घंटानाद सुरु झाला.
(3) जेव्हा आरती सुरु झाली तेव्हा घंटानाद सुरु झाला.
(4) आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो.

43. खिडकीत, कितीक, लाडूत, नदीत या शब्दांची संधी कोणती ते ओळखा.

(1) पररूप संधी
(2) पूर्वरूप संधी
(3) विसर्ग-उकार संधी
(4) प्रथम-व्यंजन संधी

44. संयुक्त वाक्य नसलेले वाक्य ओळखा.

(1) लोक आपली स्तुती करोत किंवा निंदा करोत.
(2) रात्र फार झाली होती परंतु गाडी आलीच नाही.
(3) जेव्हा एस्.टी. सुटली तेव्हा अंतूशेटनी आपले डोळे पुसले.
(4) किशोरने खूप अभ्यास केल्यामुळे तो परीक्षेत उत्तीर्ण झाला.

45. जोड्या जुळवा.

| | गट 'अ' | | गट 'ब' |
|---|---|---|---|
| (a) | एकाच काळात हयात असलेले | (i) | निपुत्रिक |
| (b) | ज्याने पुष्कळ ऐकले व वाचले आहे असा | (ii) | बहुश्रुत |
| (c) | ज्याचे वर्णन करता येत नाही असे | (iii) | समकालीन |
| (d) | ज्याला मुले बाळे नाहीत असा | (iv) | अवर्णनीय |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Scanned with CamScanner

46. 'तोंडी लावणे' या शब्दाचा समास ओळखा.

(1) उपपद तत्पुरुष समास
(2) अलुक् तत्पुरुष समास
(3) नञ् तत्पुरुष समास
(4) कर्मधारय समास

47. 'आई-वडिलांनी मुलांना मायेने वाढवावे/वाढविले'. या वाक्याच्या क्रियापदावरून प्रयोग ओळखा.

(1) कर्तरी प्रयोग (2) कर्मणी प्रयोग (3) कर्मकर्तरी प्रयोग (4) भावे प्रयोग

48. 'पीयूष' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द ओळखा.

(1) अमृत (2) सुधा (3) पियूख (4) विष

49. अर्जुनाला मासा दिसला. (प्रयोग ओळखा)

(1) कर्म-भाव प्रयोग
(2) कर्तरी प्रयोग
(3) कर्मणी प्रयोग
(4) भावे प्रयोग

50. त्याच्यासाठी हजार रूपये ही देखील मोठी रक्कम आहे, हे वाक्य कोणत्या प्रकारचे आहे?

(1) होकारार्थी वाक्य (2) नकारार्थी वाक्य (3) आज्ञार्थी वाक्य (4) विधानार्थी वाक्य

51. पत्राची वैशिष्ट्ये लिहा.

(a) स्पष्टता
(b) अचुकपणा
(c) सुटसुटीतपणा
(d) नम्रता

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) बरोबर
(2) (c) आणि (d) बरोबर
(3) (b) आणि (d) बरोबर
(4) वरील सर्व बरोबर



Scanned with CamScanner

52. व्यतिरेकवाचक शब्दयोगी अव्ययांचा गट ओळखा.

(a) शिवाय, खेरीज, विना
(b) विषयी, विशी, बद्दल
(c) विना, वाचून, परता
(d) आत, बाहेर, मागे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (b) व (d) बरोबर
(3) फक्त (a) व (d) बरोबर
(4) फक्त (b) व (c) बरोबर

---

53. 'गेला होता' क्रियापदाचा प्रकार ओळखा.

(1) शक्य क्रियापद (2) साधित क्रियापद (3) संयुक्त क्रियापद (4) सिध्द क्रियापद

---

54. विचार करणे सोपे नाही, डोके दुखू लागणे हे त्याचेच लक्षण आहे. या स्पष्टीकरणाच्या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.

(a) डोके उठणे (b) डोके भडकणे (c) डोके वर काढणे (d) डोके खाजवणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (d) बरोबर
(2) फक्त (b) व (c) बरोबर
(3) फक्त (c) व (d) बरोबर
(4) फक्त (a) व (b) बरोबर

---

55. 'प्रज्ञाच्या आठवणीने आईचे डोळे पाणावले' या वाक्यातील 'पाणावले' या शब्दाचे क्रियापद ओळखा.

(1) साधित क्रियापद
(2) सिद्ध क्रियापद
(3) शक्य क्रियापद
(4) भावकर्तृक क्रियापद

---



Scanned with CamScanner

पुढील उतारा वाचून त्यावर आधारित असलेले प्रश्न क्रमांक 56 ते 60 ची उत्तरे लिहा.

मी सतत चिंतन करीत असतो, गाभा शोधीत असतो तेव्हा मला जाणवते, युवासागराला आपल्या भव्य शक्तीचे भान अद्याप झालेले नाही! या ढगांना आपल्या लपलेल्या विद्युल्लतेचा पत्ता नाही, अंदाज नाही. या कृष्ण-मेघांना कळत नाही की करंगळीवर क्षितिज पेलणारा कृष्णसुद्धा याच वयाचा होता. याहूनही लहान होता! ज्याचे ध्यान आपल्या ध्येयाशी एकटक निगडित झाले आहे तो युवा!

दररोज मी स्वत:ला शोधीत असतो. कधीकधी मी एकाकी असतो. जखम दिसत नाही, पण घायाळ असतो. अशा एकाकीपणात मला अंकुर फुटतात. मी स्वत:विरुद्ध माझ्यापाशीच तक्रार करीत असतो. युवा तो असतो, जो इतरांविरुद्ध नव्हे, तर स्वत:विरुद्ध स्वत:जवळच तक्रारी मांडीत असतो. मी ते दु:ख पाहिले. माझ्याजवळ इतकी ताकद होती. मग मी पुढे का सरसावलो नाही? माझ्यात करुणेची, प्रेमाची शक्ती होती तर काल मी पळून का गेलो? का त्या प्रसंगाला सामोरा गेलो नाही? ही अस्पृश्यता, विषमता, अज्ञान, दारिद्र्य, लाचारी मी सहन करू शकत नाही. मग जीवनाच्या रणांगणाकडे जाताना माझी पावले का अशी रेंगाळतात? कृतीच्या क्षणी मी का माघारी वळतो? जो लाचारीने शरमिंदा होतो, तो युवा. आपल्या या लाचारीवर तो एकान्तात अश्रू ढाळतो. ते क्षण त्याला बळ देत असतात, अगतिकतेच्या पलीकडे झेपावण्याचे, उष:कालापूर्वी घनदाट अंधकार जरूर असतो, पण प्रभातकाल सन्निध असल्याची चाहूल तो अंधार देत असतो. युवा तो, जो जगातले अंधारलेले कोपरे उजळवतो. त्याचबरोबर आपल्या हृदयातला कोपराही दीप्तिमान करतो. परिस्थितीचे लगाम खेचून जो तिला काबूत आणतो तो युवा. (पण) साहसालाही एक अट असते, लक्ष्मणरेषा आखण्याची. तरुणाईने आपल्या जीवनात ही लक्ष्मणरेषा आखून घेतली नाही म्हणून ही शक्ती विध्वंसनात, उलथापालथीत कामी येत आहे. आपल्या युवाशक्तीला त्यांनी योग्य रस्त्यावर हाकारले नाही. कधी छोट्या छोट्या प्रकल्पात, कार्यक्रमात, इवल्याशा क्रांतीत ती तो उधळून टाकतो. पण, चहाच्या किटलीतल्या वाफेने जनतेचे रथ चालत नसतात!

आजची युवा पिढी आहे केवळ स्पेक्टेटर जनरेशन प्रेक्षक पिढी, देखू पिढी! ती केवळ पाहते आहे – कुठे कशी क्रांती कधी घडून येते. जेथे बांधून घ्यावे लागेल, कार्यमग्न व्हावे लागेल असे राजकारण तिला नको! कार्यक्रम असा असावा की ज्यात बांधिलकी (कमिटमेंट) सुद्धा असावी आणि सहभागही (इन्व्हॉलमेंट) असावा, जेव्हा कुणी युवक माझ्याकडे स्वाक्षरी मागायला येतो तेव्हा मी हैराण होतो. युवक तो आहे, जो इतरापासून संदेश वा स्वाक्षरी मागीत नसतो. तो घटनांवर आणि क्षणावर आपली स्वाक्षरी उमटवितो!

आता काय आहे, काय नाही याचे चऱ्हाट आणि रडगाणे बंद झाले पाहिजे. ती पिढी अशी आहे, हा धर्म असा आहे, सोडून द्या या गोष्टी. धर्माने दुनियेचे भले होईल यावर भरोसा ठेवायची तुमच्यावर कुणी सक्ती तर नाही ना केली? आपसात वैर करावे असे धर्म सांगत नाही; पण त्याच्याच नावावर झगडे होत आहेत.

56. प्रस्तुत उताऱ्यासाठी अधिक योग्य शीर्षक कोणते?

(1) जीवनाचे रणांगण

(2) युवकाची बांधिलकी

(3) युवा जीवनाला समाजाचे अडथळे

(4) युवासागर



Scanned with CamScanner

57. तरुणांची शक्ती कोणत्या कार्यात वाया जात आहे ?

(a) विधायक कार्यात
(b) विध्वंसनात व उलथापालथीत
(c) अंधारलेले कोपरे उजळण्यात
(d) कृतीच्या क्षणी माघारी वळण्यात

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) सत्य
(2) फक्त (b) आणि (c) सत्य
(3) फक्त (c) आणि (d) सत्य
(4) फक्त (b) आणि (d) सत्य

---

58. आजच्या युवा पीढीतील दोषस्थळे सांगा.

(a) प्रेक्षक पीढी व दुसऱ्यांची तक्रार करणारे
(b) बांधिलकी नसलेला व दु:खी
(c) सहभाग नसणारे व समस्यांपासून पळणारे
(d) घटनांवर व क्षणांवर स्वाक्षरी न उमटविणारा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b), (c) बरोबर
(2) फक्त (c), (d), (a) बरोबर
(3) फक्त (b), (c), (d) बरोबर
(4) वरील सर्व बरोबर

---

59. युवाशक्तीची लक्षणे कोणती ?

(a) परिस्थितीचे लगाम खेचून काबूत आणणारा
(b) लाचारीने शरमिंदा न होणारा
(c) प्रसंगांना सामोरे जाणारा
(d) करुणेची, प्रेमाची शक्ती असणारा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) सत्य
(2) (b), (c), (d) सत्य
(3) (c), (d), (a) सत्य
(4) वरील सर्व सत्य

---

60. युवा कुणाला म्हणावे ?

(1) एकाकी व तरुण असतो त्याला
(2) जगाचे भान असलेला
(3) आपल्या भव्य शक्तीचे भान झालेला
(4) वयाच्या 25 वर्षापर्यंतच्या तरुणाला

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

06/08/2022 12:0

Scanned with CamScanner

61. Besides making a promise he kept it .

Select the correct alternative that transforms the above sentence into a compound sentence.

(1) He not only made a promise, but he also kept it.

(2) Not only he made a promise, but also kept it.

(3) Make a promise and keep it.

(4) He has made a promise to keep it.

62. Identify the sentence/s punctuated correctly.

(a) The sun having risen; we continued our journey.

(b) He fought for his ideal earnestly, devotedly and bravely.

(c) How noble is mercy !

(d) Alas, that a friend should be false.

**Answer Options :**

(1) Only (a) and (b)
(2) Only (b) and (c)
(3) Only (a) and (c)
(4) Only (d)

63. Fill in the blank with an appropriate Preposition.

'I have eaten nothing ________ yesterday'.

(1) for
(2) since
(3) on
(4) till

64. Match the sentences with their types :

| | |
|---|---|
| (a) Be careful. | (i) Interrogative |
| (b) How careful you are ! | (ii) Declarative |
| (c) You are careful. | (iii) Exclamatory |
| (d) Are you careful ? | (iv) Imperative |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |



Scanned with CamScanner

65. Identify the sentence/s grammatically correct.

(a) Jane had a baby in October.

(b) He studied briefly the problem.

(c) He studied the problem briefly.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c)
(2) Only (b)
(3) Only (a) and (b)
(4) Only (b) and (c)

---

66. White (A) are painting (B) many people (C) these days (D) there houses (E)

Choose the correct order of words to make the sentence meaningful.

(1) (C) (B) (E) (A) (D)
(2) (D) (A) (B) (C) (E)
(3) (E) (C) (B) (D) (A)
(4) (C) (A) (B) (D) (E)

---

67. Identify the part of speech of the underlined words in the following sentences and choose the correct option of their sequence.

(a) He is a brave king.

(b) My friend did it quite correctly.

(c) Oh ! She looks beautiful.

(d) Behind the house, there is a garden.

**Answer Options :**

(1) Adverb, Adjective , Interjection, Preposition
(2) Adjective, Adverb, Interjection, Preposition
(3) Adverb, Noun, Interjection, Pronoun
(4) Noun, Adjective, Interjection, Preposition

---

68. Identify the Non-finite clause and its type (underlined) in the following sentence.

Eating tobacco is injurious to health.

(1) Non-finite relative clause
(2) Non-finite '-En' relative clause
(3) Non-finite -Ing noun clause
(4) Non-finite comparative clause

---



06/08/2022 12:08

Scanned with CamScanner

69. Identify the sentence/s with correct use of adjectives.

(a) The flowers smell sweet.

(b) Gopal is senior to you by two years.

(c) This calf is elder than that.

(d) Many a times I remembered you.

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)

(3) Only (b), (c) and (d) (4) Only (c)

70. Fill the blank with the most appropriate form of the verb given in the brackets.

'We _________ for you for two hours (wait)

(1) have been waiting (2) are waiting

(3) would have been waiting (4) none of the above

71. Identify the complex sentences in the following :

(a) My father has bought a car. The car is expensive.

(b) My father has bought a car which is expensive.

(c) This is the hospital. I was born here.

(d) This is the hospital where I was born.

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c)

(3) Only (c) and (d) (4) Only (b) and (d)

72. Choose the correct sentence/s with correct question-tag.

(a) One can't be faithful to all, can one ?

(b) We have lunch at 1 pm, do we ?

(c) They have a big factory, haven't they ?

(d) She is in her sixties, doesn't she ?

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (c) and (d)

(3) Only (b) and (d) (4) Only (a) and (c)

73. Choose the correct question-tag for the following sentence.

Monica isn't very tall, _________.

(1) Is she ? (2) Isn't she ? (3) Isn't it ? (4) Doesn't she ?



Scanned with CamScanner

74. Identify the correct sentence/s.

(a) A cow has four hooves.

(b) I bought five dozen mangoes.

(c) He has worn a trouser.

(d) This news has disturbed me.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c)
(2) Only (b) and (d)
(3) Only (a) and (b)
(4) Only (b), (c) and (d)

75. Match the following :

| | A | | B |
|---|---|---|---|
| (a) | Kennel | (i) | A remedy which is supposed to cure all diseases |
| (b) | Spinster | (ii) | Place where dogs are kept |
| (c) | Polygamy | (iii) | An unmarried woman |
| (d) | Panacea | (iv) | Having several wives at the same time |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

76. Identify the meaning of the underlined word in the following sentence.

'He was <u>censured</u> by the Lok Sabha'

(1) praised
(2) criticised
(3) expelled
(4) punished

77. Choose the correct alternative having words with correct spellings .

(1) evidence - confidence - appearance - omniscient

(2) evidence - confidence - appearance - omnicient

(3) evidance - confidence - apperaence - omniscient

(4) evidance - confidance - apperance - omniscient



Scanned with CamScanner

78. Identify the correct conditional sentences in the following.

(a) If she works hard she will secure first position.

(b) If he will take an early bus he will reach Poona in the afternoon.

(c) If you whistled the girls would mind it.

(d) If he would try hard, he would get a first class.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c)
(2) Only (b) and (d)
(3) Only (a), (b) and (c)
(4) Only (a), (c) and (d)

79. He ________ in a hurry.

Complete the sentence choosing the correct phrase.

(1) went off (2) went over (3) went on (4) went through

80. Complete the following sentence choosing the correct alternative.

'A philanthropist is ________'.

(1) A lover of humanity
(2) One who hates woman
(3) A hater of mankind
(4) A man with abnormal habits

81. In spite of financial constraint Raghu started his business and very soon became a successful industrialist.

Choose the synonym for the underlined word.

(1) crisis (2) restriction (3) support (4) freedom

82. Choose the **incorrect** sentence.

(1) I met Meena upon the way to my office.
(2) She jumped into the river.
(3) The police caught the thief by the arm.
(4) I do not agree to your proposal.

83. Identify the sentence/s with correct use of prepositions.

(a) I am tired of this work.

(b) He ordered for a new car.

(c) He resembles to his brother.

**Answer Options :**

(1) Only (a)
(2) Only (b)
(3) Only (c)
(4) Only (b) and (c)



Scanned with CamScanner

84. She gave her hand to a good-looking young sailor.

The underlined idiom may be substituted by :

(1) Marry

(2) Behave arrogantly

(3) Surrender

(4) Pass from the ownership of one person to that of another

85. Identify the part of the following sentence that contains grammatical error.

'These kind (a) of dresses seem to be (b) expensive but it is (c) relatively economical to maintain them (d).

**Answer Options :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

86. What are the other options open to us ?

(Choose the correct meaning of the underlined word in the given context)

(1) given (2) available (3) practicable (4) passable

87. Identify the correct sentence in the following examples :

(1) I have no competition for you with this prize.

(2) I have no competition with you for this prize.

(3) He hasn't got some money.

(4) I have no authority over you.

88. Money-laundering is a punish ________ offence.

Choose the correct suffix to the word underlined to make it meaningful .

(1) -ing (2) -ment (3) -able (4) -ful

89. One who looks at the brighter side of things ________.

Choose the one word substitute for the sentence.

(1) optimist (2) altruist (3) pessimist (4) atheist

90. Choose the correct one word substitute for the following sentence.

'One who moves from one country to another'

(1) Eminent (2) Vagabond (3) Emigrant (4) Immigrant

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Scanned with CamScanner

91. Identify the correct sentence/s.

(a) Each of the boys have finished his work.

(b) Many a men was killed in the war.

(c) Neither of the three is present here.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c) (2) Only (b)

(3) Only (c) (4) Only (b) and (c)

92. Identify the functions (SPOCA) of the underlined words in the following sentences and choose the correct option for their sequence.

(a) Your daughter is pretty.

(b) He made his wife happy.

(c) He had given the girl an apple.

(d) He had given the girl an apple.

(Cs = subject Complement, A= Adverb, Oi = Indirect object, Od = Direct object, Co = Object Complement)

**Answer Options :**

(1) Cs, A, Oi, Od (2) Co, Oi, Od, Cs

(3) Od, Cs, Oi, Co (4) Cs, Co, Od, Oi

93. Good people will compensate for any damages they cause.

Choose the correct phrase for the underlined.

(1) make up for (2) make up with (3) make for (4) make with

94. Identify the correct sentence/s.

(a) The glass feels smooth.

(b) The plant grew quickly.

(c) Bangalore is a worth seeing city.

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c)

(3) Only (b) and (c) (4) Only (c)



Scanned with CamScanner

95. Identify the degree in the following sentence.

'The lion is the most dangerous animal in the forest'.

(1) Comparative (2) Superlative (3) Positive (4) None of the above

**Read the following passage carefully and answer the questions given below it :**

Toys are **meant for children.**

But making them is no child's play. Their manufacturers here need to be reminded of this. The toys that they produce are, almost without exception, of the poorest quality. Not surprisingly, many parents prefer to buy the imported variety even though these are usually much more expensive. Japanese toys for instance, are in great demand despite the heavy import duty. The two Chacha Nehru Toy "libraries" in Delhi and Bombay also rely largely on foreign made toys. Thus, the other day a report disclosed that 4,000 Canadian toys would soon be added to the library at Bombay. Why can't we produce good toys in India ? The manufacturers are largely to blame. They have been making the best of a protected market to palm off shoddily produced toys which are often made from defective materials and fall apart after a few days. Some of them are positively dangerous. Their pointed corners and sharp edges can easily hurt children. What is perhaps worse, they have little educational value. Their makers here, unlike in the West, are evidently unconcerned whether a particular toy will stimulate a child to use his or her imagination. Experts cite three other criteria for a good toy : it should be 'durable; it should 'grow' with the child (blocks of different types, for instance); and it should 'lessen' the distance between parents and children. Few of our toys can pass these tests. Why cannot an organisation like the National Design Institute take up this matter and lay down aesthetic and safety regulations ? The authorities can go even further : they can help to start a dialogue between toy manufacturers, designers and inventors on the one side and parents and educationists on the other. The Government has begun to take greater interest in children's books and children's films. When will it turn its attention to toys ?

96. Which one of the following criteria for good toy is not suggested by the author ?

(1) Toy should be durable

(2) Toy should 'grow' with the child.

(3) Toy should reduce the distance between the parents and the children.

(4) A good toy should be imported.

97. Which one of the following statement best summarises the theme of the passage ?

(1) There is a need to import the toys from abroad as the toys produced in our country are not good.

(2) As import duties are high, we should produce our own toys.

(3) Toys produced in our country are dangerous to handle, so they should be banned.

(4) It is our duty to see that toys produced for children should entertain and instruct them.

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

Scanned with CamScanner

98. According to the author, the business of toy making should involve ________.

(1) manufacturers, designers and users.

(2) manufacturers, inventors, designers, parents and educationists.

(3) parents, educationists, buyers and manufacturers.

(4) manufacturers, inventors, designers and users.

---

99. Select the correct word for the underlined, from the passage.

of very faulty quality.

(1) defective (2) dangerous (3) ugly (4) unattractive

---

100. A toy should be durable.

Give antonym for the word underlined, in the given context.

(1) consumable (2) tough (3) delicate (4) defective

---

-oOo-



Scanned with CamScanner

**सूचना** – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वतःबरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग–1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

by→ @testpapersmpsc

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर–क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर–क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

@MPSCTech26

SEAL

Scanned with CamScanner